९ फेब्रुवारी २०११

## गोकुळदास तेजपाल रुग्णालयात नवीन पद निर्मिती करण्यास मान्यता

गोकुळदास तेजपाल रुग्णालयात नवीन पद निर्मिती करण्यास मान्यता देण्यात आली. मुंबई येथील गोकुळदास तेजपाल रुग्णालयाच्या श्रेणीवर्धनांतर्गत एम.आर.आय. आणि सि.टी.स्कॅन यंत्रे खरीदी करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

ही यंत्रसामुग्री रुग्णालयामध्ये कार्यान्वित करण्यासाठी एकूण २० नवीन पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली. सहयोगी प्राध्यापक -१, अधिव्याख्याता -२, कनिष्ठ निवासी -६, परिसेविका -१, अधिपरिचारिका -४, सि.टी.स्कॅन तंत्रज्ञ -५ आणि क्ष-किरण सहाय्यक -१ अशी ही पदे राहणार आहेत. याशिवाय ५ पदे बाह्यस्त्रोतांमधून भरण्यात येतील.

या पदांसाठी एकूण ६३ लाख ५० हजार एवढा आवर्ती खर्च अपेक्षित आहे.

---o---

## नागपूर जिल्हा फळे व भाजीपाला खरेदी-विक्री सहकारी संस्थेला शीतगृह उभारणीसाठी वाढीव अर्थसहाय्य

नागपूर जिल्हा फळे व भाजीपाला खरेदी-विक्री सहकारी संस्थेला शीतगृह उभारणीसाठी वाढीव अर्थसहाय्य मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला.

विदर्भातील शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक वर्षापासून अपूर्ण असलेल्या नागपूर जिल्हा फळे व भाजीपाला खरेदी विक्री सहकारी संस्था मर्यादित, नागपूर या संस्थेला ३००० मे.टन क्षमतेच्या प्रि-कुलींग व कोल्ड स्टोरेज प्रकल्पाकरिता राष्ट्रीय सहकारी विकास निगमने (एन.सी.डी.सी.) मंजूरी दिलेल्या वाढीव अर्थसहाय्यानुसार राज्य शासनामार्फत संस्थेला कर्जाच्या रुपात रु.५९.३८८ लाख व भागभांडवल म्हणून रु.७४.२३५ लाख असे एकूण रु.१३३.६२३ लाख रकमेचे वाढीव अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यास व हा निधी चालू वर्षी अर्थसंकल्पीत करुन संस्थेस वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली.

---0---

## नागरी संरक्षण दलात सुधारणा योजनेंतर्गत रत्नागिरी व सिंधुदुर्गात दोन नवीन कार्यालये

नागरी संरक्षण दलाच्या स्वरुपात बदल करुन हे दल प्रत्येक जिल्हयात सुरु करण्यासाठी नागरी संरक्षण दलात सुधारणा (Revamping of Civil Defence) ही केंद्र शासनाची योजना महाराष्ट्र राज्यात सुरु करण्यास आणि या योजने अंतर्गत पहिल्या टप्प्यात रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयात नागरी संरक्षण दलाची कार्यालये नव्याने सुरु करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

महाराष्ट्र राज्यात सध्या मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, उरण व तारापूर या ठिकाणी नागरी संरक्षण दल कार्यरत आहे. युध्दजन्य परिस्थितीत नागरिकांना मदत करण्यासाठी नागरी संरक्षण दलाची निर्मिती करण्यात आली आहे. मात्र मागील ३० वर्षात युध्द न झाल्याने किंवा युध्दाचे स्वरुप बदलल्याने नागरी संरक्षण दलाचा उपयोग मानवनिर्मित किंवा नैसर्गिक आपत्तीच्या वेळी "आपत्ती व्यवस्थापनासाठी" सध्या करण्यात येत आहे. नागरी संरक्षण दलाचे स्वरुप बदलून आपत्ती व्यवस्थापनाबरोबरच पोलीस दलाला अंतर्गत सुरक्षेसाठी, तसेच कायदा व सुव्यवस्थेला धोका निर्माण होईल त्यावेळी मदत करणे" यासाठी करण्याकरिता तसेच नागरी संरक्षण दल संवेदनशील शहराऐवजी प्रत्येक जिल्हयात सुरु करण्यासाठी केंद्र शासनाने Revamping of Civil Defence ही योजना ११ व्या पंचवार्षिक योजनेत (सन २००७-०८ ते २०११-१२) सुरु केली आहे.

केंद्र शासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी रु. ४.२२ कोटी निश्चित केले असून त्यापैकी रु. १३५.५३ लक्ष निधी राज्य शासनास सन २०१०-११ करिता मुंबई येथील प्रशिक्षण महाविद्यालयाचे नूतनीकरण, प्रशिक्षण साहित्य, साधनसामुग्री खरेदी, प्रसिध्दी व जनजागृती व पायलट प्रोजेक्ट, इत्यादीकरिता उपलब्ध करुन दिला आहे.

----oo-----

९ फेब्रुवारी २०११

**शासकीय आणि शासन अनुदानित (आयुर्वेद व युनानी)**
**महाविद्यालयांच्या शैक्षणिक शुल्कात वाढ**

राज्यातील शासकीय आणि शासन अनुदानित (आयुर्वेद व युनानी) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून घ्यावयाच्या शैक्षणिक शुल्कात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

राज्यातील शासकीय आणि शासन अनुदानित (आयुर्वेद व युनानी) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणार शैक्षणिक शुल्क दिनांक ६ सप्टेंबर २००३ च्या शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आले होते. सध्याचे शैक्षणिक शुल्क अत्यल्प आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालये तसेच रुग्णालयांवर होणाऱ्या खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणारे विद्यार्थी व पालक हे वाढीव फी बाबत सतर्क राहतील व त्याची त्यांना वेळीच जाणीव करून देणे योग्य होईल, त्यामुळे सन २०११-१२ पासून वाढीव शैक्षणिक शुल्क लागू करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी पुढील प्रमाणे शिक्षण शुल्कात वाढ करण्यात येत आहे :

| अ. क्र. | विद्याशाखेचे नाव | सध्याचे शैक्षणिक शुल्क (रुपये) | प्रस्तावित शैक्षणिक शुल्क + विकास निधी प्रति वर्षी (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय | १८,०००/- | ४०,००० + ५००० |
| २ | दंत | १५,०००/- | ३०,००० + ३००० |
| ३ | आयुर्वेद | ७,५००/- | १५,००० + ३००० |
| ४ | युनानी | ७,५००/- | १५,००० + ३००० |
| ५ | भौतिकोपचार व व्यवसायोपचार | ७,५००/- | १५,००० + ३००० |
| ६ | डी.एम.एल.टी | १८,०००/- | १८,००० + निरंक |
| ७ | परिचर्या | ३०००/- | ६०००/- + निरंक |
| ८ | बी.पी.एम.टी. | - | १८,००० + निरंक |

वरील तक्त्यातील स्तंभ ४ मधील शुल्क सन २०११-१२ पासून लागू करण्यात येईल व पूढील शुल्क निश्चिती होईपर्यंत या शुल्कात दरवर्षी शैक्षणिक शुल्काच्या १० टक्के एवढी वाढ करण्यात येईल. उपरोक्त शैक्षणिक शुल्काखेरीज प्रवेश शुल्क, वसतीगृह व ग्रंथालय शुल्कातही काही वाढ करण्यात येत आहे.

---o---